MHNS160008352025

**<u>आदेश क्रं. ०५ खाली</u>**

**दिनांक ०२/०४/२०२६**

(१) वादीने सदरचा दावा जाहीर ठराव होउन मिळण्यासाठी, दावा मिळकतीची संयुक्तीक मोजणी होउन मिळणेसाठी व निरंतरचा ताकिद हुकूम मिळण्यासाठी दाखल केला असुन सदरच्या दाव्यात वादीने प्रतिवादीविरुध्द क्रं. ०५ खाली दावा मिळकतीची संयुक्तीक मोजणी होऊन तसा मोजणी नकाशा तयार होईपावेतो प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी स्वतः अथवा त्यांचे कुटूंबातील कुणाही व्यक्तीने चुकीच्या व बेकायदेशीर मोजणी रजि क्र. ५२९१/२०२० चे नकाशाचे आधारे व अतिक्रमण केस क्र.९५/२०२१ चे चुकीचे व बेकायदेशीर निकालाचे आधारे व पुर्ननिरीक्षण अपिल क्र.५५८/२०२३ चे निकालाचे आधारे वादी यांना गट क्र. ३२८ या मिळकतीचे मेहनत, मशागत करणेस हरकत, अडथळे करू नये व मोजणी नकाशात दाखविलेले ०=१८ आर चुकीचे अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा घेण्याचा प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी महसुली अधिकारी यांचेशी संगनमत करून प्रयत्न करू नये या करीता तात्पुरता ताकिद मनाई हुकूमा करीता सदर अर्ज दाखल केला आहे.

(२) वादीने त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, मिळकतीचे वर्णन – तुकडी जि.प. नाशिक पो. तु. तालुका पंचायत समिती चांदवड पैकी मौजे साळसाणे येथील शेतजमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे –

**अ)** गट क्र.३२८ क्षेत्र हे २=८४ आर, पो.ख.०=११ आर, एकुण क्षेत्र हे २=९५ आर, आकार रू.४ = ७० पैसे यापैकी पश्चिमेकडील क्षेत्र हे १–४२ आर, पो.ख. ०=०६ आर ही मिळकत दाव्याचा विषय आहे. यासी चतुः सिमा

**पुर्वेस –** गट क्र.३२८ पैकी उर्वरीत क्षेत्र,

**दक्षिणेस –** गट क्र.३२७,

**पश्चिमेस–**३२९,

**उत्तरेस**–गट क्र.३२२.

**ब)** गट क्र.३२९ क्षेत्र हे १–७७ आर, पो.ख.०=१९ आर, एकुण क्षेत्र हे १–९६ आर, आकार रू.२=७२ पैसे यासी चतुः सिमा

**पुर्वेस –** गट क्र. ३२८,

**दक्षिणेस –** गट क्र. ३२७,

**पश्चिमेस –** गट क्र.३३०,

**उत्तरेस –** गट क्र.३२२.

येणेप्रमाणे मिळकती जलतरू, काष्टपाषाण इत्यादी तदंगभूत वस्तुसह दरोबस्त मिळकत. सदर मिळकतीस स्पष्टता येण्याकरीता यापुढे **दावा मिळकत** असे संबोधण्यात येते.

(३) वादीने त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, गट क्र. ३२८ ही मिळकत वादी यांचे वडीलोपार्जीत मालकीची व कब्जावहीवाटीची अशी असून गट क्र. ३२८ पैकी दाव्याचा विषय असलेली मिळकत हे १–४२ आर, पो.ख. ०=०६ आर ही वादी हीचे मालकीची व कब्जावहीवाटीची अशी आहे व गट क्र.३२८ पैकी हे १–४२ आर, पो.ख. ० = ०५ आर ही मिळकत प्रतिवादी क्र.५ ते १० यांचे मालकीची व कब्जावहीवाटीची अशी आहे तसेच दावा कलम १ यात वर्णन केलेली गट क्र. ३२९ ही मिळकत प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे वडीलोपार्जीत मालकीची व कब्जावहीवाटीची आहे असे कथन केले आहे.

(४) वादीने त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, वादींचे दाव्यातील गट क्र.३२८ व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे गट क्र. ३२९ या मिळकतीचे दरम्यान पुर्वापारपासून उत्तर–दक्षिण असा बांध आहे. सदर उत्तर–दक्षिण बांधाचे पुर्वेस वादी यांची गट क्र. ३२८ ही मिळकत असून सदर उत्तर–दक्षिण बांधाचे पश्चिमेस प्रतिवादी क्र.१ ते ४ यांची गट क्र. ३२९ ची मिळकत आहे. सदरचे उत्तर–दक्षिण बांधावर मोठ मोठाली झाडे देखील होती व ती प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी दांडगाईने कापुन टाकली त्याचे बुडे आजही उत्तर–दक्षिण बांधावर कायम

आहे तसेच उत्तर–दक्षिण बांधावर एक इलेक्ट्रीक पोल देखील सुमारे १५–२० वर्षापासून आहे. तसेच वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे गट क्र.३२८ व ३२९ या मिळकतीमधुन पाझरतलावासाठी क्षेत्र संपादीत झालेले आहे सदर संपादीत क्षेत्राचे उत्तरेस देखील वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे गट क्र.३२८ व ३२९ या मिळकतीचे क्षेत्र शिल्लक आहे तसेच प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे गट क्र. ३२९ या मिळकती मधुन उत्तर–दक्षिण पाटचारी देखील गेलेली आहे असे कथन केले आहे.

(५) वादीने त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे गट क्र.३२८ व ३२९ या मिळकतीची जंगल परिस्थिती असताना वादी यांना उत्तर–दक्षिण बांध फोडून प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे मिळकतीत अतिक्रमण करणे शक्य नसतानाही प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी गट क्र.३२९ या मिळकतीची मोजणी होऊन हद्दी निशाण्या कायम होऊन मिळणेसाठी उपअधिक्षक भूमी अभिलेख, चांदवड यांचेकडे मोजणी रजि क्र.५२९१/२०२० प्रमाणे अर्ज दाखल केला त्यानंतर सर्व्हेअर यांनी गट क्र.३२९ या मिळकतीची ता.७/४/२०२१ रोजी चुकीची मोजणी करून ता.१०/४/२०२१ रोजी चुकीच्या हद्दी निशाण्या दाखविल्या व सदरचे मोजणी मध्ये वादी यांनी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे गट क्र. ३२९ या मिळकतीमध्ये ०=१८ आर क्षेत्रात अतिक्रमण केल्याचे चुकीचे दाखविले ते मोजणी नकाशात राखाडी रंगाने दाखविले आहे. त्यानंतर प्रतिवादी यांनी वादी यांचे विरूध्द मोजणी नकाशात दाखविलेले ० = १८ आर अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळणेसाठी उपविभागीय अधिकारी चांदवड यांचे कोर्टात अतिक्रमण केस क्र.९५/२०२१ ची दाखल केली व सदर मोजणी नकाशाचे आधारे उपविभागीय अधिकारी चांदवड यांनी ता.७/७/२०२३ रोजी ०=१८ आर अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा वादी यांनी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना देववावा असा चुकीचा व बेकादेशीर निकाल महाराष्ट्र जमिन महसुल कायदा १९६६ चे कलम १३८ मधील तरतुदीप्रमाणे मोजणी करणारे सर्व्हेअर यांनी साक्ष

न नोंदविता मोजणी नकाशा शाबीत झालेला नसतानाही चुकीचा निकाल दिला त्या निकालाविरूध्द वादी व प्रतिवादी क्र.५ ते १० यांनी अपर विभागीय आयुक्त नाशिक यांचे कोर्टात आर.टी. एस. अतिक्रमण पुर्ननिरीक्षण अर्ज क्र.५५८/२०२३ चा दाखल केले त्याचा निकाल ता. २८/४/२०२५ रोजी होऊन वादी यांचे पुर्ननिरीक्षण अपिल अमान्य करून उपविभागीय अधिकारी चांदवड यांनी अतिक्रमण केस क्र.९५/२०२१ मध्ये ता.७/७/२०२३ रोजी दिलेला निकाल कायम करण्यात आला असे कथन केले आहे.

(६) वादीने त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, उपविभागीय अधिकारी चांदवड यांनी अतिक्रमण केस क्र.९५/२०२१ मध्ये ता.७/७/२०२३ रोजी व अपर विभागीय आयुक्त नाशिक आर.टी.एस. अतिक्रमण पुर्ननिरीक्षण अर्ज क्र.५५८/२०२३ यात ता. २८/४/२०२५ रोजी दिलेले निकाल हे चुकीचे व बेकायदेशीर असे आहे त्याचप्रमाणे सदरचे निकाल मोजणी नकाशा शाबीत झालेला नसताना व कायद्यातील तरतुदीप्रमाणे मोजणी नकाशावर सर्व्हेअर यांची साक्ष नोंदविल्या शिवाय मोजणी नकाशा कायद्याने शाबीत होत नाही म्हणून दिलेले निकाल चुकीचे व बेकायदेशीर असे आहे म्हणून सदरचे निकाल वादी यांचेवर कायद्याने बंधनकारक नाही असा जाहीर ठराव करून मिळणेसाठी सदरचा दावा दाखल केला आहे असे कथन केले आहे.

(७) वादीने त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, मोजणी रजि क्र.५२९१/२०२० प्रमाणे सर्व्हेअर यांनी केलेली मोजणी ही चुकीची व बेकायदेशीर आहे. गट क्र. ३२९ ची मोजणी करताना सर्व्हेअर याना फिक्स पॉइंट मिळालेला नव्हता व नाही तसेच मोजणी नकाशात पाझर तलावासाठी जे गट क्र. ३२९ मधुन क्षेत्र संपादीत झाले ते क्षेत्र किती संपादीत झाले हे देखील मोजणी नकाशात नमूद केलेले नाही तसेच गट क्र. ३२९ मधुन उत्तर–दक्षिण तिरकस कॅनॉलचे पाण्याचे पाटचारी गेलेली आहे त्या चारी साठी किती क्षेत्र संपादीत केले व त्याखाली किती क्षेत्र गेले हे देखील मोजणी करताना मोजणी नकाशात नमूद

केलेले नाही तसेच गट न.३२८ व ३२९ या मिळकतीचे उत्तर–दक्षिण बांधावर जो इलेक्ट्रीक पोल आहे तो देखील दाखविलेला नाही व चुकीची व रेकॉर्डशी विसंगत मोजणी केली असे कथन केले आहे.

(८) वादीने त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, उपअधिक्षक भूमी अभिलेख चांदवड यांनी मोजणी रजि न.५२९१/२०२० प्रमाणे मोजणी करताना वादी व प्रतिवादी क्र.५ ते १० यांचे गट क्र.३२८ या मिळकतीचे गटाची मोजणी केली नाही व फक्त प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे गट क्र.३२९ या मिळकतीची मोजणी केली व प्रतिवादी यांचे मिळकतीचे मुळ सर्व्हे नंबरचे पोटहिश्याचे सर्व गटाची देखील मोजणी केलेली नाही म्हणून प्रतिवादी यांचे गट क्र.३२९ या मिळकतीचे मुळ सर्व्हे नंबर व वादी यांचे गट क्र. ३२८ या मिळकतीचे मुळ सर्व्हे नंबरचे सर्व पोटहिश्याचे मिळकतीचे गटाची व वादी व प्रतिवादी क्र.५ ते १० यांचे गट क्र. ३२८ चे मुळ सर्व्हे नंबरचे सर्व पोटहिश्याचे मिळकतीची जो पावेतो संयुक्त मोजणी होत नाही तोपर्यंत वरील गटाच्या हद्दी कायम होऊ शकत नाही त्यामुळे निश्चित कोणी कोणाच्या क्षेत्रात किती अतिक्रमण केले याचा देखील स्पष्टपणे उलगडा होऊ शकत नाही व नामदार हायकोर्ट मुंबई यांनी काशिनाथ चिंधु शास्त्री विरूध्द हरिभाऊ नथुजी बावणथडे (महाराष्ट्र लॉ जर्नल २००४ पान क्र.७२२) व रामचंद्र भिकाजी जगताप विरूध्द दुधाराम लंगरूजी पाडवेकर (महाराष्ट्र लॉ जर्नल २००४ पान क्र. २७८) दिलेल्या न्यायनिवाड्यात अतिक्रमीत क्षेत्राबाबत वाद असल्यास जोपर्यंत वादातीत वरील गटाची मोजणी होऊन हद्दीच्या निशाण्या कायम होत नाही तोपर्यत अतिक्रमीत क्षेत्राच्या कब्जाबाबत न्यायनिर्णय देऊ नये असा निवाडा दिलेला आहे या कायदेशीर मुद्दयाचा व नामदार हायकोर्ट यांनी दिलेल्या निवाड्याचा विचार करणे आवश्यक आहे म्हणून मोजणी रजि क्र.५२९१/२०२० प्रमाणे झालेली मोजणी ही मुळ सर्व्हे नंबरचे रेकॉर्डशी व गावचे नकाशाशी व गटाचे रेकॉर्डशी विसंगत अशी आहे म्हणून ती वादी यांना मान्य व कबुल नाही म्हणून प्रतिवादी यांना वरील

कथनाप्रमाणे सर्व मिळकतीचे मुळ सर्व्हे नंबरचे पोटहिश्याचे गटाची संयुक्तीक मोजणी करून घेतल्याशिवाय वादी यांचे कडे अतिक्रमीत क्षेत्र मागता येत नाही म्हणून वादी यांनी दाव्यातील गट क्र.३२८ व ३२९ या मिळकतीचे मुळ सर्व्हे नंबरचे पोटहिश्याप्रमाणे संयुक्तीक मोजणी उपअधिक्षक भूमी अभिलेख चांदवड यांचेमार्फत होऊन मिळणेसाठी व दावा मिळकतीची संयुक्तीक मोजणी होऊन तसा मोजणी नकाशा तयार होईपावेतो प्रतिवादी यांनी स्वतः अथवा त्यांचे कुटूंबातील कुणाही व्यक्तीने चुकीच्या व बेकायदेशीर मोजणी रजि न.५२९१/२०२० चे नकाशाचे आधारे व अतिक्रमण केस क्र.९५/२०२१ चे चुकीचे व बेकायदेशीर निकालाचे आधारे व पुर्ननिरीक्षण अपिल क्र.५५८/२०२३ चे निकालाचे आधारे वादी यांना गट क्र. ३२८ या मिळकतीचे मेहनत, मशागत करणेस हरकत, अडथळे करू नये व मोजणी नकाशात दाखविलेले ०=१८ चुकीचे अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा घेण्याचा प्रयत्न करू नये अशी निरंतरची ताकीद देवविण्यासाठी सदरचा दावा दाखल केलेला आहे. दाव्यातील प्रतिवादी क्र.५ ते १० हे गट न. ३२८ चे सहमालक असून मात्र मोजणी नकाशात दाखविलेले क्षेत्र हे दाव्याचा विषय असलेल्या मिळकतीमध्ये दाखविले आहे त्यामुळे दाव्याकामी आवश्यक पक्षकाराची उणीव भासू नये व दाव्यात तांत्रिक दोष राहू नये म्हणून प्रतिवादी क्र.५ ते १० यांना आवश्यक पक्षकार म्हणून सामील केले आहे असे कथन केले आहे.

(९) वादीने त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, सकृत दर्शनी वार्दीना चांगली केस असून न्यायाचे समतोलत्व वादींचे लाभात आहे ते प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे लाभात नाही तरी वादींचे मागणीप्रमाणे प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे विरूध्द निरंतरचा ताकीद हुकूम देवविण्यात यावा. तसा तो न दिल्यास प्रतिवादी हे वादींना गट क्र. ३२८ या मिळकतीचे मेहनत, मशागत करणेस व तथाकथीत मोजणी नकाशात दाखविलेले ० = १८ आर क्षेत्राचे पुर्वापारपासूनचे मालकी व कब्जा उपभोगास बेकायदा हरकत, अडथळे करतील व कब्जा घेण्याचा प्रयत्न करतील त्यामुळे वादी यांचे कधीही न भरून येईल असे अपरिमित नुकसान होईल

व वादीस त्याचे न्याय हक्कापासून व मालकी उपभोगास वंचित व्हावे लागेल. याउलट प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे काहीएक नुकसान होणार नाही अगर गैरसोय होणार नाही तरी वादीचे लाभात प्रतिवादी विरूध्द निरंतरची ताकीद हुकूम देवविण्यात यावी अशी विनंती केली आहे.

(१०) प्रतिवादी क्रं. १ या प्रकरणात हजर झाला व त्याने नि. क्रं. ३३ व प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी नि. क्र. ५० वर त्याचा लेखी जबाब दाखल केला आहे. प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, सदरचे दाव्यातील संपूर्ण मजकूर हा खोटा व लबाडीचा असा असून तो या प्रतिवादींस मान्य व कबुल नसून तो संपूर्ण मजकूर सिद्ध करण्याची जबाबदारी वादी यांची आहे. वादीस सदरचा दावा व मनाई हुकूमाचा अर्ज दाखल करणेस कोणतेही योग्य व संयुक्तीक कारण घडलेले नसल्यानेही वादीचा दावा व मनाई हुकूमाचा अर्ज रद्द होणेस पात्र आहे असे कथन केले आहे.

(११) प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादीचे दाव्यातील व मनाई हुकुमाचे अर्जातील जी–जी विधाने हे प्रतिवादी स्पष्टपणे नाकरतात अशी सर्व ती ती विधाने वादीनी शाबीत करणे आवश्यक आहे. वादीचे दाव्यास व मनाई हुकुमाचे अर्जास मुदतीच्या कायद्याची हरकत आहे. वादीचे दाव्यास मिस जॉइंडर ऑफ़ पार्टीज या तत्वची बाधा येत असलेनेही वादीचा दावा रद्द होणेस पात्र आहे कारण प्रतिवादी क्र. २ ते ४ यांचे दावा मिळकतीचे ७/१२ सदरी नावे नमुद नसतांनाही, तसेच प्रतिवादी क्र.५ ते १० यांचा दावा मिळकतीशी काहीएक संबंध नसतांनाही त्यांना सदरचे दाव्यात प्रतिवादी म्हणून सामिल केलेले आहे असे कथन केले आहे.

(१२) प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादी यांना सदरचा दावा दाखल करण्यास कोणतेही कारण घडलेले नसुन त्यामुळे वादी यांनी त्यांचे दिलेले दाव्यास कारण हे खोटे, लबाडीचे व बनावट असे असुन ते या प्रतिवादी यांना मुळीच मान्य व कबुल नाही. वादी यांचे दाव्यातील संपुर्ण मागणी ही खोटी,

लबाडीची व बेकायदेशिर अशी असंलेने वादीचा सदरचा दावा रद्द होणेस पात्र आहे असे कथन केले आहे.

(१३) प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, गट क्र.३२९ ही मिळकत प्रतिवादी क्र.१ यांचें वडीलोपार्जीत मालकीची व कब्जावहीवाटीची अशी आहे. सदर मिळकतीचे पुर्व बाजुला वादी यांची मिळकत गट क्र. ३२८ ही असुन दोनही मिळकती मध्ये उत्तर दक्षिण जो बांध होता तो बांध वादी यांनी माहे मे २०२० मध्ये ट्रॅक्टरच्या व नांगराचे सहाय्याने फ़ोडुन मुळ बांधाची नासधूस करुन व मुळ बांधाची शिस्त बदलवुन प्रतिवादी क्र.१ चे गट क्र.३२९ या मिळकतीमध्ये दांडगाईने व अनाधिकाराने बेकायदेशिरपणे अतिक्रमण केले म्हणुन प्रतिवादी क्र.१ यांनी गट क्र.३२९ या मिळकतीचे पुर्वेकडील उत्तर–दक्षिण या बांधाची परिस्थिती गावातील प्रतिष्टीत इसमांना बोलावुन दाखविली त्यावेळी वादी व कुटुंबीयांनी प्रतिवादी क्र.१ यांना सांगितले की, तुम्ही तुमचे गट क्र. ३२९ या मिळकतीची मोजणी खात्यामार्फत मोजणी करुन घ्या मोजणी तुमचे मिळकतीचे क्षेत्र निघाल्यास ते आम्ही काढुन देवु असे वादी व कुटुंबीयांनी प्रतिष्टीत इसमांसमोर मान्य व कबुल केले होते असे कथन केले आहे.

(१४) प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादी व कुटुंबीयांनी प्रतिवादी क्र.१ यांना प्रतिष्ठीत इसमां समोर सांगितले प्रमाणे प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे. गट क्र. ३२९ या मिळकतीची मोजणी होऊन हद्दी निशाण्या कायम करुन मिळणेसाठी व अतिक्रमित क्षेत्र निश्चित होऊन मिळणेसाठी उपअधिक्षक भुमि अभिलेख चांदवड यांचेकडे दि.१७/१२/२०२० अर्ज केला त्यास मो.र.क्र.५२९१/२०२० असा नमुद झाला. त्या प्रमाणे मे. उपअधिक्षक भुमि अभिलेख साहेब चांदवड यांचे सर्वेअरने प्रतिवादी क्र.१ व वादी व लगत कब्जेदारांना आगाऊ नोटीसा पाठवुन ता.०७/०४/२०२१ रोजी वादी व प्रतिवादी क्र.१ व लगत कब्जेदार यांचे समक्ष मोजणी केली व हद्दी निशाण्या दि.१२/०४/२०२१ रोजी प्रत्यक्ष जागेवर दाखवुन तसा मोजणी नकाशा तयार

केला असे कथन केले आहे.

(१५) प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, मो.र.क्र.५२९१/२०२० चे मोजणी नकाशात दाखविलेले अतिक्रमित क्षेत्राचा मालकी हक्काने प्रतिवादी क्र.१ यांनी मोजणी नंतर नकाशा मिळाले नंतर वादी यांचेकडे अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा मागितला असता वादी यांनी मोजणी नकाशात दाखविलेले अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा प्रतिष्टीत इसमां समोर कबुल केल्या प्रमाणे मोजणी नकाशात "आकाशी" रंगाने दाखविलेल्या हे००.१८आर अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा वादी यांनी अर्जदारांना देण्यास नकार दिला. वास्तविक मोजणी नकाशात दाखविलेले अतिक्रमीत क्षेत्र वादी यांना त्यांचे ताब्यात ठेवण्याचा कायद्याने हक्क व अधिकार नाही. तसेच त्या बाबत वादी यांचेकडे अतिक्रमण क्षेत्राचा कब्जा मागण्यासाठी दि.१५/०४/२०२१ रोजी प्रतिवादी क्र.१ ही गेली असता वादी यांनी तो देण्यास नकार दिला व प्रतिवादी क्र.१ यांना व त्यांचे मुलांना मारण्याचीं धमकी दिली त्यामुळे दि.१६/०४/२०२१ रोजी तशी फ़िर्याद चांदवड येथील पोलीस निरक्षक साहेब यांचे कडे नोंदविली व त्यास प.ना.क.क्र.२८६/२०२१ असा नमुद झाला. सदरचे अतिक्रमीत क्षेत्रात वादी वा असलेला ताबा हा गैरकायदा व अनाधिकाराचा असा आहे या अतिक्रमण क्षेत्राचा ताबा वादीकड्डुन मिळणेसाठी प्रतिवादी यांनी उपविभागीय अधिकारी चांदवड यांचेकडे अतिक्रमण केस क्र.९५/२०२१ ची दाखल केलेली होती. सदरचे अतिक्रमण केस मध्ये वादी हजर झाले परंतु त्यांनी त्यांचा लेखी जबाब दाखल केला नाही, त्यानंतर उपविभागीय अधिकारी यांनी अतिक्रमण केस मध्ये दाखल असलेल्या सर्व दस्तऐवजांची कायदेशिर रित्या शहानिशा करुन प्रतिवादी क्र.१ यांचे अतिक्रमण केस क्र.९५/२०२१ ही दि.०७/०७/२०२३ रोजी मंजुर केली. सदरचे आदेशा विरुध्द वादी हे नाराज होवुन त्यांनी अप्पर विभागीय आयुक्त साहेब नाशिक यांचेकडे पुनरिक्षण अपिल क्र. ५५८/२०२३ चे दाखल केले. सदर अपिलामध्ये वादी यांनी उपविभागीय अधिकारी यांचे आदेशास स्थगिती दिली व

त्यानंतर प्रतिवादी क्र.१ यांनी सदरचे अपिलामध्ये हजर होवुन त्यांचा लेखी व तोंडी युक्तीवाद दाखल केला व ता.२८/०४/२०२५ रोजी वादीचे अपिल नामंजुर करुन उपविभागीय अधिकारी चांदवड यांनी अतिक्रमण केस क्र.९५/२०२१ मध्ये दिलेला आदेश कायम केला असे कथन केले आहे.

(१६) प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, अशा प्रकारे सदरच्या आदेशा नंतरही आज तागायत प्रतिवादी क्र.१ यांनी कोणत्याही कोर्टात अतिक्रमण क्षेत्राचा कब्जा द्यावा म्हणून अर्ज दाखल केलेला नसतांनाही केवळ मो.रं.क्र.५२९१/२०२० चे मधील अतिक्रमण क्षेत्राचा कब्जा प्रतिवादी क्र.१ यांना द्यावा लागु नये व तो कोब्जा देण्यास विलंब व्हावा या दृष्ट हेतुने खोट्यात शिरुन वादी यांनी सदरचा खोटा दावा दाखल केलेला आहे. वास्तविक वादी यांनी मो.र.क्र.५२९१/२०२० मधील मोजणी नंतर सदर मोजणी मान्य नाही म्हणून निमताना मोजणी भरणे आवश्यक होते परंतु ते देखील वादी यांनी न करता उलट उपविभागीय अधिकारी यांचेकडील निकालावर खोटे अपिल दाखल करुन काल अपव्यय केला आहे. तसेच वादी यांनी नाशिक येथील अप्पर आयुक्त यांचेकडे आर.टी.एस.अपिल क्र.५५८/२०२३ चे दाखल करतांना प्रतिवादी क्र.५ ते १० यांना अपिलार्थी म्हणून सामिल केले मात्र सदर अपिलावर व वकिल पत्रावर प्रतिवादी क्र.५ ते १० यांच्या कोठेही सह्या अगर अंगठे नाही. या वरुन वादीचे वर्तन हे खोटे व लबाडीचे आहे हेच सिध्द होते असे कथन केले आहे.

(१७) प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, तसेच दावा मिळकत गट क्र. ३२९ या मिळकतीशी प्रतिवादी क्र.२ ते ४ यांचा कोणत्याही प्रकारचा हितसंबंध नसुन ता. २४/१२/२००२ रोजी चे मृत्युपत्रान्वये त्यांची नावे ७/१२ सदरी कमी झालेली असुन तशी नोंद क्र.२१२३ ही कायम करण्यात आलेली आहे याची माहिती वादी यांना असुनही त्या प्रतिवादी क्र.१ यांच्या बहिणी आहे म्हणून केवळ त्यांना त्रास देण्यासाठी त्यांना प्रतिवादी पणात सामिल केलेले आहे, सदरचे दावा मिळकतीचे कब्जेदार सदरी त्यांची कोणत्याही प्रकारची मागणी नाही.

वादी यांनी दाव्यासोबत दाखल केलेला गट क्र. ३२९ मध्ये देखील प्रतिवादी क्र.२ ते ४ यांचे कोठेही नावे सामिल नाही असे कथन केले आहे.

**(१८)** प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादी व त्यांचे कुटुंबीय हे अतिशय खुनशी व दांडगाईचे प्रवृत्तीचे आहे. म्हणून ता.३०/०४/२०२३ रोजी देखील वादीने प्रतिवादी यांची मिळकत गट क्र.३२९ चे दरम्यान अतिक्रमण क्षेत्रा लगत चर खोदला व पुन्हा अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला म्हणुन प्रतिवादी क्र.१ यांनी दि.११/०५/२०२३ रोजी चांदवड पोलीस स्टेशन मध्ये अर्ज केला होता. वादी यांनी सन २०२२ मध्ये शासकीय जमिनीवर अतिक्रमण करुन साळसाणे येथील पाझर तलावाचे सांडव्याचे बाजुने अतिक्रमण केले व त्याचे पाणी प्रतिवादी क्र.१ च्या शेतात सोडले त्यामुळे प्रतिवादी यांचे कधीही न भरुन येईल असे नुकसान झाले म्हणून प्रतिवादी यांनी त्या बाबत पंचायत समिती चांदवड यांचेकडे रितसर तशी ऑनलाईन तक्रार केली, सदरचे तक्रारी वरुन पंचायत समिती चांदवड यांनी व ग्रामसेवक साहेब साळसाणे यांनी जागेवर येवुन वरील सांडव्याची पाहणी केली व तसे अतिक्रमण काढणे बाबत वादी यांना लेखी सुचना देखील केल्या, तसेच वादी व त्यांचे कुटुंबीयां विरुध्द चांदवड पोलीस स्टेशनमध्ये एन.सी.क्र.२८६/२०२१, एन.सी.क्र.४५७/२०२३, गु.र.क्र.३८४/२०२४, गु.र.क्र.३३०/२०२० अशा प्रकारे गंभीर गुन्हे दाखल आहे असे कथन केले आहे.

**(१९)** प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. २ ते ४ यांची नावे दिनांक ०१/११/२०२३ रोजी नोंद क्र. २१२३ ने दावा मिळकतीवरुन कमी झालेले असून ती माहिती वादी यांना तेव्हापासून होती व आहे, तसेच वादी यांनी त्यांचे दाव्यातील नि.क्र. ३ सोबत दाखल केलेल्या दस्तऐवज यादी सोबत गट क्र. ३२९ चा ७/१२ उतारा दाखल केलेला असून त्यातही प्रतिवादी क्र. २ ते ४ यांची नावे नाहीत. दावा मिळकत गट क्र. ३२९ मध्ये प्रतिवादी क्र. १ हिचेच मालकीचा असून सदर मिळकतीवर तिचे एकटीचाच कब्जा आहे. प्रतिवादी क्र. २ ते ४ या येवला तालुक्यात राहणाऱ्या आहेत या

वरील सर्व गोष्टी वादी यांना पूर्वी पासून माहिती आहे, केवळ त्यांना मे. कोर्टात यावे–जावे लागावे, त्यांना मानसिक त्रास व्हावा, खर्च व्हावा या करीता वादी यांनी हेतुपुरस्कर रित्या त्यांना दाव्यात सामिल केलेले आहे असे कथन केले आहे.

(२०) प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, सकृत दर्शणी वादीस काहीएक केस नाही, न्यायाचे समतोलत्व वादीचे लाभात नाही तो या प्रतिवादी यांचे लाभात आहे तरी वादीचे लाभात दाव्यातील मागणी प्रमाणे या प्रतिवादी यांचे विरुध्द मनाई हुकुम अथवा अन्य हुकुम देवविण्यात येवु नये तसा तो दिल्यास प्रतिवादी यांना त्यांचे मालकीचे व कब्जेवहीवाटीचें दावा मिळकतीचा उपभोग घेण्यास अडथळे निर्माण होतील, तसेच प्रतिवादी क्र.१ यांना त्यांचे मालकीचे असलेल्या क्षेत्राचां कब्जा होणेसं विलंब होईल त्यामुळे या प्रतिवादी चे कधीही न भरुन येईल असे अपरिमित नुकसान होईल व प्रतिवादी यांना त्याचे न्याय हक्कापासुन व मालकी हक्कापासुन वंचित व्हावे लागेल, या उलट वादीचे मागणी प्रमाणे वादीचे लाभात तुर्तातुर्त ताकीद हुकुम दिला नाही तर वादीचे काहीएक नुकसान होणार नाही अगर गैरसोय होणार नाही, त्यामुळे वादीचा नि. क्रं. ५ चा अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

(२१) वादी व प्रतिवादींच्या वकिलांनी केलेला युक्तीवाद ऐकला. दाव्यात दाखल केलेली कागदपत्रे पाहिली. वरील परिस्थितीत माझ्यासमोर खालील प्रश्न उपस्थित होतात. त्या प्रश्नांचा कारणांसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्रं.** | **विचाराधीन प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादीनें आपले म्हणणे सकृतदर्शनी (Prima–facie case ) सिध्द केले आहे काय ? | **...होकारार्थी.** |
| २ | न्यायाचे समतोलत्व (Balance of convenience) वादींचे बाजुने आहे काय ? | **...होकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| ३ | तुर्तातुर्त मनाईचा आदेश न केल्यास वादींचे अपरिमित नुकसान (irreparable loss) होणार आहे हे वादींनी सिध्द केले आहे काय ? | **...होकारार्थी.** |
| ४ | कोणता आदेश ? | **अंतिम ओदशानुसार.** |

**कारणमिमांसा**

**विचाराधीन प्रश्न क्रं. १ ते ३ करीताः–**

(२२) उभयपक्षकारांच्या तज्ञ वकिलांचा युक्तिवाद ऐकला. दस्तऐवजांचे अवलोकन केले.

(२३) वादीने त्यांच्या अर्जात असे कथन आहे की, गट क्र. ३२८ ही मिळकत वादी यांचे वडीलोपार्जीत मालकीची व कब्जावहीवाटीची अशी असून गट क्र. ३२८ पैकी दाव्याचा विषय असलेली मिळकत हे १–४२ आर, पो.ख. ०=०६ आर ही वादी हीचे मालकीची व कब्जावहीवाटीची अशी आहे व गट क्र.३२८ पैकी हे १–४२ आर, पो.ख. ० = ०५ आर ही मिळकत प्रतिवादी क्र.५ ते १० यांचे मालकीची व कब्जावहीवाटीची अशी आहे तसेच दावा कलम १ यात वर्णन केलेली गट क्र. ३२९ ही मिळकत प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे वडीलोपार्जीत मालकीची व कब्जावहीवाटीची आहे असे कथन केले आहे.

(२४) वादीने त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे गट क्र.३२८ व ३२९ या मिळकतीची जंगल परिस्थिती असताना वादी यांना उत्तर–दक्षिण बांध फोडून प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे मिळकतीत अतिक्रमण करणे शक्य नसतानाही प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी गट क्र.३२९ या मिळकतीची मोजणी होऊन हद्दी निशाण्या कायम होऊन मिळणेसाठी उपअधिक्षक भूमी अभिलेख, चांदवड यांचेकडे मोजणी रजि क्र.५२९१/२०२० प्रमाणे अर्ज दाखल केला त्यानंतर सर्व्हेअर यांनी गट क्र.३२९ या मिळकतीची ता.७/४/२०२१ रोजी मोजणी करून ता.१०/४/२०२१ रोजी चुकीच्या हद्दी

निशाण्या दाखविल्या व सदरचे मोजणी मध्ये वादी यांनी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे गट क्र. ३२९ या मिळकतीमध्ये ०=१८ आर क्षेत्रात अतिक्रमण केल्याचे नकाशात राखाडी रंगाने दाखविले आहे असे कथन केले आहे. वादीने त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, मोजणी रजि क्र.५२९१/२०२० प्रमाणे सर्व्हेअर यांनी केलेली मोजणी ही चुकीची व बेकायदेशीर आहे.

(२५) वादीने त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, उपअधिक्षक भूमी अभिलेख चांदवड यांनी मोजणी रजि न.५२९१/२०२० प्रमाणे मोजणी करताना वादी व प्रतिवादी क्र.५ ते १० यांचे गट क्र.३२८ या मिळकतीचे गटाची मोजणी केली नाही व फक्त प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे गट क्र.३२९ या मिळकतीची मोजणी केली व प्रतिवादी यांचे मिळकतीचे मुळ सर्व्हे नंबरचे पोटहिश्याचे सर्व गटाची देखील मोजणी केलेली नाही म्हणून प्रतिवादी यांचे गट क्र.३२९ या मिळकतीचे मुळ सर्व्हे नंबर व वादी यांचे गट क्र. ३२८ या मिळकतीचे मुळ सर्व्हे नंबरचे सर्व पोटहिश्याचे मिळकतीचे गटाची व वादी व प्रतिवादी क्र.५ ते १० यांचे गट क्र. ३२८ चे मुळ सर्व्हे नंबरचे सर्व पोटहिश्याचे मिळकतीची जो पावेतो संयुक्त मोजणी होत नाही तोपर्यंत वरील गटाच्या हद्दी कायम होऊ शकत नाही त्यामुळे निश्चित कोणी कोणाच्या क्षेत्रात किती अतिक्रमण केले याचा देखील स्पष्टपणे उलगडा होऊ शकत नाही असे कथन केले आहे.

(२६) वादीने नामदार हायकोर्ट मुंबई यांनी काशिनाथ चिंधु शास्त्री विरूध्द हरिभाऊ नथुजी बावणथडे (महाराष्ट्र लॉ जर्नल २००४ पान क्र.७२२) व रामचंद्र भिकाजी जगताप विरूध्द दुधाराम लंगरूजी पाडवेकर (महाराष्ट्र लॉ जर्नल २००४ पान क्र. २७८) दिलेल्या न्यायनिवाड्यात अतिक्रमीत क्षेत्राबाबत वाद असल्यास जोपर्यंत वादातीत वरील गटाची मोजणी होऊन हद्दीच्या निशाण्या कायम होत नाही तोपर्यत अतिक्रमीत क्षेत्राच्या कब्जाबाबत न्यायनिर्णय देऊ नये असा निवाडा दिलेला असल्याबाबत कथन केले आहे. म्हणून वरील कथनाप्रमाणे सर्व मिळकतीचे मुळ सर्व्हे नंबरचे पोटहिश्याचे गटाची संयुक्तीक मोजणी करून

घेतल्याशिवाय वादी यांचे कडे अतिक्रमीत क्षेत्र मागता येत नाही म्हणून वादी यांनी दाव्यातील गट क्र.३२८ व ३२९ या मिळकतीचे मुळ सर्व्हे नंबरचे पोटहिश्याप्रमाणे संयुक्तीक मोजणी उपअधिक्षक भूमी अभिलेख चांदवड यांचेमार्फत होऊन मिळणेसाठी व दावा मिळकतीची संयुक्तीक मोजणी होऊन तसा मोजणी नकाशा तयार होईपावेतो प्रतिवादी यांनी स्वतः अथवा त्यांचे कुटूंबातील कुणाही व्यक्तीने चुकीच्या व बेकायदेशीर मोजणी रजि न.५२९१/२०२० चे नकाशाचे आधारे व अतिक्रमण केस क्र.९५/२०२१ चे चुकीचे व बेकायदेशीर निकालाचे आधारे व पुर्ननिरीक्षण अपिल क्र.५५८/२०२३ चे निकालाचे आधारे वादी यांना गट क्र. ३२८ या मिळकतीचे मेहनत, मशागत करणेस हरकत, अडथळे करू नये व मोजणी नकाशात दाखविलेले ०=१८ चुकीचे अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा घेण्याचा प्रयत्न करू नये अशी निरंतरची ताकीद देवविण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे असे कथन केले आहे. वादीने त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, सकृत दर्शनी वादींना चांगली केस असून न्यायाचे समतोलत्व वादींचे लाभात आहे ते प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे लाभात नाही तरी वादींचे मागणीप्रमाणे प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे विरूध्द निरंतरचा ताकीद हुकूम देवविण्यात यावा अशी विनंती केली आहे.

(२७) प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, वादी यांनी माहे मे २०२० मध्ये ट्रॅक्टरच्या व नांगराचे सहाय्याने फ़ोडुन मुळ बांधाची नासधूस करुन व मुळ बांधाची शिस्त बदलवुन प्रतिवादी क्र.१ चे गट क्र.३२९ या मिळकतीमध्ये दांडगाईने व अनाधिकाराने बेकायदेशिरपणे अतिक्रमण केले म्हणुन प्रतिवादी क्र.१ यांनी गट क्र.३२९ या मिळकतीचे पुर्वेकडील उत्तर–दक्षिण या बांधाची परिस्थिती गावातील प्रतिष्टीत इसमांना बोलावुन दाखविली त्यावेळी वादी व कुटुंबीयांनी प्रतिवादी क्र.१ यांना सांगितले की, तुम्ही तुमचे गट क्र. ३२९ या मिळकतीची मोजणी खात्यामार्फत मोजणी करुन घ्या मोजणी तुमचे मिळकतीचे क्षेत्र निघाल्यास ते आम्ही काढुन देवु असे वादी व कुटुंबीयांनी प्रतिष्टीत इसमांसमोर मान्य व कबुल

केले होते व अतिक्रमित क्षेत्र निश्चित होऊन मिळणेसाठी प्रतिवादीने उपअधिक्षक भुमि अभिलेख चांदवड यांचेकडे दि.१७/१२/२०२० अर्ज केला त्यास मो.र.क्र.५२९१/२०२० असा नमुद झाला. त्या प्रमाणे मे. उपअधिक्षक भुमि अभिलेख साहेब चांदवड यांचे सर्वेअरने प्रतिवादी क्र.१ व वादी व लगत कब्जेदारांना आगाऊ नोटीसा पाठवुन ता.०७/०४/२०२१ रोजी वादी व प्रतिवादी क्र.१ व लगत कब्जेदार यांचे समक्ष मोजणी केली व हद्दी निशाण्या दि.१२/०४/२०२१ रोजी प्रत्यक्ष जागेवर दाखवुन तसा मोजणी नकाशा तयार केला असे कथन केले आहे.

(२८) प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, मो.र.क्र.५२९१/२०२० चे मोजणी नकाशात दाखविलेले अतिक्रमित क्षेत्राचा मालकी हक्काने प्रतिवादी क्र.१ यांनी मोजणी नंतर नकाशा मिळाले नंतर वादी यांचेकडे अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा मागितला असता वादी यांनी मोजणी नकाशात दाखविलेले अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा प्रतिष्टीत इसमां समोर कबुल केल्या प्रमाणे मोजणी नकाशात "आकाशी" रंगाने दाखविलेल्या हे००.१८आर अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा वादी यांनी अर्जदारांना देण्यास नकार दिला व अशा प्रकारे सदरच्या आदेशा नंतरही आज तागायत प्रतिवादी क्र.१ यांनी कोणत्याही कोर्टात अतिक्रमण क्षेत्राचा कब्जा द्यावा म्हणून अर्ज दाखल केलेला नसतांनाही केवळ मो.रं.क्र.५२९१/२०२० चे मधील अतिक्रमण क्षेत्राचा कब्जा प्रतिवादी क्र.१ यांना द्यावा लागु नये व तो कोब्जा देण्यास विलंब व्हावा या दृष्ट हेतुने खोट्यात शिरुन वादी यांनी सदरचा खोटा दावा दाखल केलेला आहे असे कथन केले आहे.

प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, सकृत दर्शणी वादीस काहीएक केस नाही, न्यायाचे समतोलत्व वादीचे लाभात नाही तो या प्रतिवादी यांचे लाभात आहे तरी वादीचे लाभात दाव्यातील मागणी प्रमाणे या प्रतिवादी यांचे विरुध्द मनाई हुकुम अथवा अन्य हुकुम देवविण्यात येवु नये तसा तो दिल्यास प्रतिवादी यांना त्यांचे मालकीचे व कब्जेवहीवाटीचें दावा मिळकतीचा उपभोग घेण्यास

अडथळे निर्माण होतील, तसेच प्रतिवादी क्र.१ यांना त्यांचे मालकीचे असलेल्या क्षेत्राचां कब्जा होणेसं विलंब होईल त्यामुळे या प्रतिवादी चे कधीही न भरुन येईल असे अपरिमित नुकसान होईल व प्रतिवादी यांना त्याचे न्याय हक्कापासुन व मालकी हक्कापासुन वंचित व्हावे लागेल, या उलट वादीचे मागणी प्रमाणे वादीचे लाभात तुर्तातुर्त ताकीद हुकुम दिला नाही तर वादीचे काहीएक नुकसान होणार नाही अगर गैरसोय होणार नाही, त्यामुळे वादीचा नि. क्रं. ५ चा अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

(२९) उभयपक्षकारांच्या तज्ञ वकिलांचा युक्तिवाद ऐकला. दस्तऐवजांचे अवलोकन केले. वादीच्या व प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे, दोन्ही गटांची एकत्रीत मोजणी झालेली नाही. पूर्वी झालेल्या मोजणी प्रमाणे महसूल न्यायालयाकडे अपिल प्रलंबित आहे. वादी व प्रतिवादींच्या कथनावरुन वाद मिळकतीची संयुक्तीक मोजणी करण्यात आलेली नाही व त्यामुळे निश्चीत कोणते क्षेत्र अतिक्रमीत आहे ही बाब या दाव्यात वादांकित आहे.

(३०) मा. नामदार हायकोर्ट मुंबई यांनी **काशिनाथ चिंधु शास्त्री विरूध्द हरिभाऊ नथुजी बावणथडे (महाराष्ट्र लॉ जर्नल २००४ पान क्रं.७२२) व रामचंद्र भिकाजी जगताप विरूध्द दुधाराम लंगरूजी पाडवेकर (महाराष्ट्र लॉ जर्नल २००४ पान क्रं. २७८)** दिलेल्या न्यायनिवाड्यात अतिक्रमीत क्षेत्राबाबत वाद असल्यास जोपर्यंत वादातीत वरील संपूर्ण गटाची संयुक्त मोजणी होऊन हद्दीच्या निशाण्या कायम होत नाही तोपर्यंत अतिक्रमीत क्षेत्राच्या कब्जाबाबत न्यायनिर्णय देऊ नये असा निवाडा दिलेला आहे.

(३१) उभयपक्षकारांनी त्यांच्या मिळकतीची संयुक्त गटाची मोजणी केलेली नाही. त्यावर अंमल होणे अपेक्षीत आहे. तसेच, वादीने अतिक्रमन केले आहे किंवा कसे व त्यानुसार सदरच्या वादातीत क्षेत्राचा कब्जा वादीकडे बेकादेशीर आहे किंवा कसे या सर्व बाबी पुराव्याअंती शाबीत होणा–या आहेत. वादीने अभिलेखावर

दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्यानुसार वादीची प्रथमदर्शनी केस स्पष्टपणे सिध्द होते. त्यामुळे निश्चितच वादी हा तुर्तातुर्त मनाई हूकूम मिळण्यास पात्र आहे.

(३२) वरील विवेचनाप्रमाणे प्रथमदर्शनी केस वादीच्या बाजुने असून न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने झुकताना दिसतो. तसेच, जर तुर्तातुर्त मनाई हूकूमाचा आदेश पारीत केला नाही तर दाव्याची गुंतागुंत वाढू शकते व वादीचे कशानेही न भरुन निघणारे नुकसान होणार आहे. **वादीने एक महिन्याच्या आत संयुक्ती मोजणीकरीता अर्ज देउन तशी मोजणी करुन घेतल्यास प्रतिवादीला कोणतेही नुकसान होणार नाही**. म्हणुन वरील सर्व बाबींचा विचार करता मी प्रश्न क्रं. १ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवून तात्पुरता मनाईहुकूम वादीच्या हक्कात देणे न्यायोचित समजतो व प्रश्न क्रं. ४ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | वादीचा अर्ज नि.क्रं. ०५ मंजुर करण्यात येतो. |
| २. | अर्जात नमूद केलेल्या कारणास्तव मोजणी रजि. क्र.५२९१/२०२० च्या आधारे वाद गटाचे संयुक्त मोजणीपूर्वी व कायदेशीर प्रक्रियेचे पालन न करता (Without following due process of law) प्रतिवादींना वाद मिळकतीचा कब्जा देऊ नये व वाद मिळकतीतील कब्जाला अडथळे निर्माण होतील असे कोणतेही विघातक कृत्य या दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत करू नये अशी तुर्तातुर्त ताकीद प्रतिवादी व सर्व संबंधीतांना देण्यात येते. |
| ३. | खर्चाबाबत दाव्याचे अंतिम निकालाचे वेळी विचार करण्यात यावा. |

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2026.04.02 19:08:13 +0530

ठिकाण : चांदवड. **(एस. एस. छल्लाणी)**

दिनांक : ०२/०४/२०२६. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, चांदवड.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :– | ***नामदेव एम. शेडगे,***<br>लघुलेखक (श्रेणी–३) |
| न्यायालयाचे नाव | :– | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्या.क्रं.१), चांदवड. |
| न्यायनिर्णयाची तारीख | :– | ०२/०४/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | :– | ०२/०४/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | :– | ०२/०४/२०२६ |